# गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर

पो. कोळपेवाडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर.

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

जा.क्र.४९/२६५/२०२४-२०२५ दि. २९/०७/२०२४

प्रति,

मा.श्री./श्रीमती/मे. ____________________

आपले गौतम सहकारी बँक लि., गौतमनगरची सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाची ४९ वी **''वार्षिक सर्वसाधारण सभा''** शनिवार, दि. १७/०८/२०२४ रोजी दुपारी २.०० वा. बँकेचे विद्यमान व्हा. चेअरमन मा. **श्री. बापूराव दगुराव जावळे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी मु.पो. गौतमनगर, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर येथे बँकेच्या मुख्य कार्यालयातील जनरल मिटींग हॉल/सभागृहामध्ये होणार आहे, तरी आपण या सभेत उपस्थित रहावे, ही विनंती.

**: सभेपुढील विषय :**

**विषय नं. १** दिनांक १९/०८/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

**विषय नं. २** दिनांक ३१/०३/ २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून त्यास मंजुरी देणे.

**विषय नं. ३** दिनांक ३१/०३/२०२४ अखेर बँकेचा ताळेबंद पत्रक व सन २०२३-२०२४ या कालावधीतील नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.

**विषय नं. ४** सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करून त्याची नोंद घेणे व सदर अहवालाचा दोष- दुरुस्ती पूर्तता अहवालाची नोंद घेऊन स्वीकृत करणे.

**विषय नं. ५** मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

**विषय नं. ६** मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या सन २०२४-२०२५ सालाकरिता खर्चाचे व उत्पन्नाचे अंदाज पत्रकास मान्यता देणे तसेच सन २०२३-२०२४ सालच्या अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

**विषय नं. ७** सन २०२४-२०२५ या वर्षाकरिता वैधानिक लेखापरीक्षणासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियास शिफारसीवरुन मंजुरी मिळालेल्या सनदी लेखापरीक्षकांच्या नेमणुकीची नोंद घेणे व त्यांचा मेहनताना शासकीय नियमानुसार देण्यास मान्यता देणे,

**विषय नं. ८** बँकेच्या मा. संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७५ (२) नुसार आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये येणे बाकी कर्जाची माहिती घेणे.

**विषय नं. ९** मा. संचालक मंडळास बाहेरील निधी उभारणीचे अधिकार देणे.

**विषय नं. १०** बँकेच्या संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्तीस मंजुरी देणे,

**विषय नं. ११** मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या वार्षिक विकास आराखड्यानुसार सन २०२३-२०२४ मध्ये केलेल्या कामकाजाच्या आढाव्याची नोंद घेणे,

**विषय नं. १२** सभासदांना बँकिंग शिक्षण व प्रशिक्षण देण्याबाबत निर्णय घेणे.

**विषय नं. १३** वैधानिक लेखापरीक्षकांनी बुडीत या वर्गवारित प्रमाणित केलेल्या अनुउत्पादित कर्ज खात्याची नावे बाकी वसुलीचा अग्रहक्क अबाधित ठेऊन सदर खाती निर्लेखिकरण करणेबाबत मंजुरी देणे.

**विषय नं १४** सन २०२३-२४ मध्ये एक रकमी कर्ज परत फेड योजना अंतर्गत तडजोड केलेल्या कर्ज खात्यांस मान्यता देणे.

**विषय नं. १५** सदर वार्षिक सर्वसाधारण समेत उपस्थित नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करून मान्यता देणे

**विषय नं. १६** मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने आयत्या वेळी आलेल्या विषयांवर विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशानुसार,<br>
**श्री. प्रवीण संतोष पावडे**<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>
गौतम सहकारी बँक लि., गौतमनगर,

स्थळ : गौतमनगर<br>
दिनांक २९/०७/२०२४

**टीप**- १) विषय पत्रिकेतील विषयाचे अनुरोधाने काही सूचना करावयाच्या असतील तर अशा सूचना दि. १०/८/२०२४ पूर्वी ऑफिस वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे लेखी कराव्यात. त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही. २) कोरमअभावी सभा तहकूब झाल्यास तीच सभा त्याच ठिकाणी अर्धा तास वाट पाहून सभेस सुरुवात केली जाईल त्यास कोरमची आवश्यकता नाही. ३) ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील, त्यांनी बँकेमध्ये समक्ष येवून घेऊन जावे. ४) सर्व सन्मा. सभासदांना विनंती करण्यात येते की, आपला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी बँकेकडे नोंद करावी म्हणजे यापुढे डिजिटल नोटीस आपणांस पाठविता येईल. ५) वार्षिक सर्वसाधारण सभा जरी सभासदांच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये संपन्न होणार असली, तरी सभेमधील उपस्थितीस महाराष्ट्र राज्य सरकार यांचेकडील उपस्थितीच्या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे बंधनकारक राहतील. ६) रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सभासदांनी / खातेदारांनी आपली के. वाय. सी. पूर्तता त्वरित पूर्ण करावी. ७) सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे, तरी सर्व सभासदांनी त्याचा लाभ घ्यावा.

## पोटनियम दुरुस्ती

### परिशिष्ट अ

### PROPOSED Bye-Laws AMENDMENT

| Buy Laws No. | Wording of the Present Bye-Laws | Proposed Bye-Laws amendment | Reason for Amendment |
|---|---|---|---|
| 59 (b) | 59 (b) Accounts Record & Audit :- The accounts of the Bank shall be audited by an auditor appointed from the panel of auditors approved by the Registrar, at least once in each year and the remuneration of auditors shall be fixed by the Registrar or the Bank as the case may be. | 59 (b) Accounts Record & Audit :- The accounts of the Bank shall be audited by an auditor appointed from the panel of auditors approved by the Registrar, at least once in each year and the remuneration of auditors shall be fixed by the registrar or the Bank as the case may be but Should take Prior permission from RBI before putting this amendment in front of AGM and Co-operative Commissioner, Pune | As per RBI Guidelines |
| 59 (c) | 59 (c) Accounts Record & Audit :- The appointment of the auditor and his remuneration shall be approved in the General Body Meeting of the Bank. The qualification/ disqualifications, powers, rights and duties of the auditor shall be as prescribed under the Act, and RBI Guidelines. | 59 (c) Accounts Record & Audit : The appointment of the auditor & his remuneration shall be approved in the General Body Meeting of the Bank. The Qualification / Disqualifications, Powers, rights and duties of the auditor shall be as prescribed under the Act, and RBI Guidelines but Should take Prior permission from RBI before putting this amendment in front of AGM and Co-operative Commissioner, Pune | As per RBI Guidelines |